Open Access

# उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 165 – 168
DOI: 10.5281/zenodo.10115286

Original Research Article

# महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना : एक अभ्यास

प्रा. डॉ. आर. बी. मादळे

सहयोगी प्राध्यापक, भूगोल विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता.मुखेड जि.नांदेड ४३१७१९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: rbmadale@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

जमीन, हवा, पाणी, सूर्यप्रकाश, आकाश हे पंचघटक ईश्वराची देणगी असून त्यावर जनसमूहाची मालकी आहे, असे गांधीजींचे ठाम मत होते. यामुळेच यावर कोणत्याही परिस्थितीत एका व्यक्तीचे किंवा समूहाचे नियंत्रण नसावे यावर त्यांचा कटाक्ष होता. गांधीजींच्या स्वराज्य संकल्पनेत म्हणजेच शेती ही सर्व विकासाची आधारशिला होती. शेतीला विकसित करणाऱ्या आणि लोकांना आवश्यक अशा वस्तूंचे उत्पादन गृहउद्योगांच्या जाळ्यातून निर्माण करून रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांची गरज त्यांनी वारंवार बोलून दाखविली. गांधीजींचा आकृतिबंध हा समूहकेंद्रित उत्पादन नव्हे तर मोठ्या समूहातून विस्तृत उत्पादन या तत्त्वावर आधारित होता. विकासासाठी मोठ्या प्रमाणावर जमीन संपादनाची विविध योजनांसाठी त्यांच्या विचारांनुसार गरज नव्हती. कारण यातून लोकांना विस्थापित करणारे, पर्यावरणाचा ऱ्हास करणारे मोठे प्रश्न निर्माण होऊ शकतात, हे त्यांना ज्ञात होते.

प्रस्तुत शोधनिबंधात म. गांधीजींच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेविषयी माहिती देण्यात आली असून सदर शोधनिबंध दुय्यम स्रोतांच्या आधारे तयार केलेला आहे.

## गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना

म. गांधीजींनी ग्रामीण विकासाबाबत निगडित असणाऱ्या विविध विषयांविषयी जे विचार मांडले, चिंतन केले. त्या सर्वांचा समावेश त्यांच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेत होतो. या संकल्पनेत त्यांनी खेड्यांची स्थिती, त्यांची सामाजिक, आर्थिक जडणघडण याला महत्त्व दिले. याशिवाय खेड्यांच्या सुधारणा करण्यासाठी खेड्यांची पुनर्रचना कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले आहे.

गांधीजी म्हणत, खरा भारत कुणाला पहायचा असेल तर त्यांनी सात लाख खेड्यांत डोकवावे. मगच तुम्हाला खरे चित्र दिसेल. म्हणून खेड्यांच्या विकासातच भारताचा विकास आहे. त्यांच्या मते, खेड्यांचे होणारे शोषण, त्यांच्याकडे होणारे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे खेडी नष्ट होतील आणि मग पर्यायाने देशच नष्ट होईल. इंग्रजांच्या आगमनापूर्वी भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. मात्र इंग्रजांच्या सत्तेच्या केंद्रीकृत प्रशासनाने खेडी पूर्णत: मोडकळीस आली. खेड्यातील संपूर्ण अर्थकारणच शेती आधारित बनले. यामुळे ग्रामीण भागाला बेकारी, दारिद्र्य या रोगांची लागण झाली.

खेड्यात रस्ते, सार्वजनिक दिवाबत्तीच्या सोयींचा अभाव, शौचालयाची अपुरी संख्या, सार्वजनिक आरोग्याकडे दुर्लक्ष, अपुरा व अनियमित पाणीपुरवठा आदी बाबी प्रकर्षाने गांधीजींच्या निदर्शनास आल्या. शिक्षणाच्या सोयी नसल्याने अंधश्रद्धा, वाईट रुढी परंपरा, निरक्षरता यामुळे त्यांच्या मागासलेपणात कमी होण्याऐवजी वाढच झाली. अर्थकारण पूर्णत: शेतीआधारित असल्याने व इतर ग्रामीण लघू व कुटीरउद्योगांच्या अभावामुळे बेकारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. गांधीजींच्या मते, खेड्यातील सर्वात गंभीर आजार म्हणजे दारुबाजी व अस्पृश्यता होय. यामुळे खेड्यांचा आर्थिक व सामाजिक ऱ्हास होत गेला. आरोग्याविषयी त्यांच्या मनात अनास्था असल्याने तसेच आरोग्याच्या सुविधांच्या अभावामुळे 1931 मध्ये भारतातील सरासरी आयुर्मान केवळ 23 वर्षे तर याच वर्षी इंग्लंडमधील सरासरी आर्युमान 57 वर्षे होते. यावरुन गांधीजींनी आपल्या देशाचे पर्यायाने खेड्याचे किती अचूक निरीक्षण केले याचा आपल्याला अंदाज येतो.

**म. गांधीजींनी खेड्यांच्या विकासासाठी सूचविलेल्या उपाययोजना**

खेड्यांच्या मागासलेपणाचे निरीक्षण करणाऱ्या गांधीजींनी त्यावरील उपाय किंवा इलाजदेखील तेवढ्याच दूरगामी व मूलभूत स्वरूपात सांगितले. खेड्यातील जनतेला आधुनिक सुखसोयींसह आपल्या उच्च सांस्कृतिक परंपरा असणाऱ्या रुढींचेदेखील पालन करता यावे अशा स्वरूपाच्या उपाययोजना त्यांनी सूचविलेल्या आहेत.

१. गावाचे आरोग्य हे गावातील सार्वजनिक ठिकाणी असणारी घाण, घनकचरा विल्हेवाट लावणे व यातून साथीच्या रोगांना अटकाव करणे शक्य होईल. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय, सार्वजनिक शौचालये, दिवाबत्तीसह गावातील रस्ते या बाबींची पुर्तता केल्यास गावाचे आरोग्य निश्चितपणे सुधारेल. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे लोकांना आरोग्य सुविधा पुरविण्याची जबाबदारी त्यांनी ग्रामसेवकावर टाकली.
२. गावातील दारिद्र्य घालविण्यासाठी गावातच प्रत्येकाला पुरेसा रोजगार उपलब्ध होणे गरजेचे आहे. काररण बेकारीतून दारिद्र्य निर्मूलन शक्य होईल. ग्रामीण उद्योगांमध्ये मुख्यत: लघू आणि कुटीरोद्योगाला प्राधान्य द्यावे. कारण यामध्ये मालक आणि कामगार बऱ्याच वेळी एकच असतो. ग्रामोद्योगात प्रामुख्याने बैल घाण्याचे तेल, पेंड, हाडसरीचे तांदूळ, मध गोळा करणे, खेळणी, चटया, साबण, हातमाग, हातकागद इ. वस्तूनिर्मितीचा समावेश होतो.

३. गांधीजींनी सहकारितेतून संपन्नता येते हा विचार मांडला. 'गाव करी ते राव न करी' एवढे बळ सामूहिक शक्तीत असते. सहकारितेच्या क्षेत्रातील सहकारी पतसंस्था, सहकारी उद्योग, दुग्ध उत्पादक संस्था, कुक्कुटपालन आदी उपक्रम यशस्वी होतात. यावर उपाय म्हणून त्यांनी 1942 साली सामूहिक शेतीची संकल्पना मांडली.

४. कोणत्याही शिक्षणाचा उद्देश हा व्यक्तीचा सर्वांगीण विकास हा असतो. यासाठी त्यांनी 'नई तालीम' शिक्षण व्यवस्था सूचविली. शिक्षण हे केवळ पुस्तकी स्वरुपाचेच न राहता रोजगार निर्मितीक्षम असावे असे त्यांचे मत होते. शिक्षणातील अभ्यासक्रमात गणित, इतिहास, भूगोल, इंग्रजी आणि मातृभाषेसह कृषिशास्त्राचादेखील समावेश असावा.

५. ग्रामपंचायतीने गावातील लोकांचा प्रामाणिकपणा आणि उद्यमशीलता यांचे पुनरुज्जीवन करावे. ग्रामपंचायतींनी गावातील लोकांचे तंटे मिटविणे, पशुसंवर्धन, दुध उत्पादनातील वाढ, लोकांनी स्वच्छता, अस्पृश्यता निवारण ही कामे करावीत. ग्रामीण भागाची प्रगती होण्यासाठी सत्तेचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे. प्रत्येक गावामध्ये शाळा, ग्रंथालये, नाट्यगृह, सभागृहे, स्वच्छतागृहे याची योग्य व्यवस्था असावी.

६. गांधीजींच्या मते, ग्रामसेवक त्यास म्हणावे जो गावाची सेवा करण्यात आपल्या जीवनाचे इतिवृत्त मानतो. जो एखादे खेडे दत्तक घेऊन तेच आपले जग मानून त्यांच्या प्रगतीत स्वत:ची प्रगती मानतो. ग्रामसेवकांची विविध कार्ये सांगताना ते म्हणतात, ग्रामसेवकाने गावाचा भंगी, रखवालदार, वैद्य, शाळामास्तर इ. कामे करावीत. त्याने विशेषत: स्वच्छता, आरोग्य, अस्पृश्यता निवारण इ. कार्यात जातीने लक्ष घालावे. त्या कार्यासाठी शासनाने ग्रामपंचायतीला विशेष निधी उपलब्ध करून द्यावा.

७. गांधीजी म्हणतात, खादी हा मध्यवर्ती सूर्य आहे व तिच्याभोवती सर्व ग्रामोद्योग अनेक ग्रहांप्रमाणे फिरतात; परंतु खादीस स्वतंत्र अस्तित्व नाही. खेड्यातील प्रत्येक व्यक्तीने दिवसातून एक तास तरी सूत कताई करावी. ज्यातून गावाची गरज भागून शहरी भागात विक्री करून उत्पन्न मिळविता येईल. यामुळे परदेशी कपड्यांवर होणारा खर्च वाचेल व आपल्या देशातील पैसा आपल्याच उद्योगात परत वापरता येईल.

**निष्कर्ष**

ग्रामस्वराज्य संकल्पनेमध्ये गांधीजींनी खेडी हाच देशाच्या पाठीचा कणा आहे ही भावना विशेष केली. म्हणूनच 'खेड्याकडे चला' अशी आग्रही सूचना ते युवकांना करतात. खेड्याच्या विकासात अस्पृश्यता, अस्वच्छता, अनारोग्य व दारिद्र्य हेच प्रमुख अडथळे आहेत. असे असले तरी खेड्यांच्या विकासास गती देणारा सर्वात मोठा गतीवर्धक म्हणजे ग्रामसेवक होय. अशा प्रकारे गांधीजींनी ग्रामस्वच्छतेसंबंधी आपले विचार मांडले आहेत व उपाययोजनाही सूचविलेल्या आहेत.

महात्मा गांधी यांची ग्रामविकासाची संकल्पना जर राज्यकर्त्यांनी जशास तशी अमलात आणली असती तर आज आपल्या देशाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला असता. आज वाढत्या लोकसंख्येमुळे शहरे बकाल झाली नसती आणि ग्रामीण भाग ओस पडला नसता. स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षानंतर ग्रामीण भागाचा खूप मोठ्या प्रमाणावर विकास

झाला असता. म्हणून किमान आतातरी राज्यकर्त्यांनी व नियोजनकर्त्यांनी गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना अमलात आणावी. तरच आपल्या देशाच्या ग्रामीण क्षेत्राचा विकास गतीने होईल.

**संदर्भ सूची**

१. कस्तुरे-वाडकर प्रभा, पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत, अरुणा प्रकाशन, लातूर

२. कारेकर शोभा, घोडके शरद, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, अंशुल पब्लिकेशन, नागपूर

३. गाठाळ साहेबराव, आधुनिक भारतीय विचारवंत, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद

४. कुलकर्णी व्ही.जी. व इतर, भारतीय राजकीय विचारवंत, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद

५. कुलकर्णी बी.वाय., भारतीय राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातूर